# सुहाना सफर

**लेख**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

## सफर लेह लडाखची


**∗ बागेश्री धुरंधर परीख ∗**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

लेह लडाख हा आपल्या भारताचाच एक भाग. जम्मू व काश्मीर या राज्यामधलाच एक जिल्हा, पण काहीसा दुर्गम. हिमालयाला समांतर असणाऱ्या झंस्कार व काराकोरम रांगांतच लडाख वसलेलं आहे. पूर्वी लेह ही लडाखची राजधानी समजली जायची पण आता लडाख हा जम्मू काश्मीरमधील एक जिल्हा मानला जातो.

एकदा जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये फिरत असताना आमची भेट श्री. विवेक नागवेकरांशी झाली. ते लेह लडाखच्या बऱ्याच सहली आयोजित करतात असं त्यांच्याकडूनच कळलं. त्यांनी केलेल्या वर्णनावरून व त्यांनी निर्माण केलेल्या आत्मविश्वासानी आम्हीसुद्धा आमच्या ५ मित्रमैत्रिणींनी लडाखला जायचं नक्की केलं.

मनात भीती तर होतीच. एकतर बऱ्यापैकी वाढलेलं वय. तब्येतीच्या कुरबुरी. पण मनाचा धीर करून जायचं ठरवलं. सहल एकूण ११ दिवसांची होती. १ ऑगस्ट २०१६ ला मुंबईहून श्रीनगरला विमानाने गेलो. तिथल्या हवामानाची व वातावरणाची हळूहळू सवय व्हावी या हेतूने लेहला न जाता प्रथम श्रीनगरला गेलो. मनात भीती होती ती श्रीनगरमधील राजकीय अस्थिरतेची. संचारबंदी तर २५ दिवसापासून चालूच होती. विमानतळातून हॉटेलवर जातानाच हे चित्र स्पष्ट दिसत होतं. दुकानं तर पूर्ण बंद. रस्त्यावर पण तुरळक रहदारी. वातावरण तसं भीतीदायकच होतं. संध्याकाळी ६ नंतर संचारबंदी शिथील झाल्यानंतर, शिकाऱ्यातून दाल लेकमध्ये चक्कर मारली आणि हॉटेलवर परत आलो. पुढचा टप्पा सोनमर्गचा होता. रात्री २ वाजता निघालात तरच सुखरूप पोचाल असा सल्ला मिळाल्याने आम्ही सर्व रात्री २ ला मिनीबसने





जीव मुठीत धरून निघालो. रस्त्यावर ठिकठिकाणी मिलीटरी गस्त घालत होती, ते बघून हायसं वाटलं. पहाटे ५ वाजता सोनमर्गला सुखरूप पोहोचलो. सोनमर्गहून कारगीलकडे कूच करायचं होतं. १९९९ च्या कारगील युद्धाबद्दल बरंच ऐकलं होतं.

कारगील हे जम्मू काश्मीरमधील दुसऱ्या क्रमाकांचं शहर आहे. पाकिस्तान प्रशासीत गीलगीट व बाल्टीस्तान प्रदेशाच्या नियंत्रण रेषेजवळ कारगील वसलेलं आहे.

कारगीलमध्ये लक्षवेधी होतं ते द्रास गावातील स्मारक (वॉर मेमोरीयल). १९९९ मध्ये झालेल्या ऑपरेशन विजय मोहिमेचे हे स्मारक आहे. कारगील युद्धात धारातीर्थी पडलेल्या हुतात्म्यांचं हे स्मारक आहे. आपला देश वाचविण्यासाठी ज्यांनी प्राणांची आहुती दिली, त्यांना अभिवादन करताना मन भरून येत होतं.

कारगीलपासून १५ ते २० किलोमीटरवर असलेल्या डोंगराळ भागात गेलो. तिथून पाक सरहद्द दिसत होती. दुर्बिणीतून त्यांचे लष्करी ठाणेसुद्धा दिसत होते. भारतीय जवानांच्या छावण्यात बसून कारगीलच्या सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेण्यात संध्याकाळ संपून गेली. बंकर्समध्ये राहून टेहळणी करणाऱ्या जवानांचं खूप कौतुक वाटलं.

लडाखचा इतिहास जम्मू काश्मीरच्या इतिहासाशी संलग्न आहे. डोग्रा घराण्याचा संस्थापक गुलाबसिंग यांच्या कारकीर्दीत काश्मीर संस्थान अस्तित्वात आले व लडाख व त्याचा भाग बनले. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर ते भारतात विलीन झाले. पण पाकिस्तानने लडाखचा वायव्य भाग व्यापला तो आजतागायत आपल्याला परत मिळाला नाही. सिंधू नदी लडाखच्या मध्यातून वायव्येस वाहात जाऊन पाकिस्तानात जाते. श्योक, नुब्रा, झंस्कार, हिस्पार, सिआचेन या नद्या पण सिंधूला मिळतात.

लडाखचे हवामान कोरडे व थंड आहे. जोरदार वारे वाहतात. वर्षातील काही काळ सर्व प्रदेश बर्फाच्छादित असतो. जुलै ते सप्टेंबर याच महिन्यात लडाखची सहल करता येते. जमीन रेताड असून फक्त १० टक्के लागवडीस योग्य आहे. काही भागात जरदाळू, सफरचंद व आक्रोडच्या बागा आहेत.

कारगीलला एक रात्र राहून आम्ही तिथून १२५ किलोमीटर अंतरावरील लामागुरू या खूपच सुंदर गावात गेलो. तेथील बौद्ध मोनास्टरी किंवा मठ फारच पहाण्याजोगा होता. ही जागा फोटुळा खिंडीजवळ होती. लडाखच्या इतर मठासारखी ही गोपापण डोंगरात वसलेली आहे. येथे मात्र वरपर्यंत गाडी जाते. येथील भिंती चित्रीत केलेल्या आहेत. बहुतेक चित्रांत लामांनी पुढील मार्ग आचरणाचे नियम चित्रीत केलेले आढळतात. जवळपासच्या गावात राहाणारी छोटी छोटी मुले बौद्ध अध्यापनासाठी लाल लाल झगे घालून येथे येतात. त्यांच्या रहाण्याची व जेवणाची सोयपण येथे केलेली असते.

लामायुरुहून जवळच असलेला मूनलँड हा रमणीय भूभाग पहाण्यास गेलो. फार प्राचीन काळी प्रचंड उल्का लामायुरुजवळ पडली आणि प्रचंड खड्डा तयार झाला. काही कालांतराने डोंगरावरून आलेलं पाणी साठून त्याचं सरोवर झालं. या प्रचंड पाण्याचा दाब सहन न होऊन ठिसूळ असलेली एक कड ढासळली व सगळं पाणी वाहून गेलं. हे कोरडं सरोवर चंद्राच्या कोरीसारखं दिसतं. इथल्या डोंगरांचा रंग मुलतानी मातीसारखा





पिवळा जर्द दिसतो.


यानंतर आम्ही प्रसिद्ध आलची गोंपा बघायला गेलो. हजारो वर्षे जुनी मॉनस्टरी आहे. तिथल्या अतिभव्य मूर्ती लक्ष वेधून घेतात. भिंतीवर चितारलेली रंगीत चित्रं जास्त बोलकी आहेत. इतक्या एकाकी जागेवर, इतक्या प्रतिकूल परिस्थितीत काढलेली चित्रं मनवेधी होती. सिंधू नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आर्ची गाव आहे. येथे एक दुरवांग किंवा मुख्य सभागार आहे. बुद्ध धर्माच्या शिकविण्याच्या आधारे, त्याच तत्त्वज्ञानातील चित्रे आहेत. आलची गोपांच्या बाहेर मात्र छोटी छोटी दुकाने आहेत. गार्नेट, क्वार्टझ, सेमीप्रेशस स्टोन्सच्या माळा, बांगड्या येथे घेता येतात. बहुतेक लडाखी बायका या रंगीबेरंगी माळा विकताना दिसतात. अंदाजे ३०० ते ५०० रुपये किंमतीच्या या वस्तू असतात. दगडांच्या व पितळी जुन्या वस्तुपण येथे मिळतात. लेहच्या पूर्वेस सुमारे १९ कि.मी. अंतरावर थिकसे गावात, थीकसे गोंपा (मॉनस्टरी) आहे. हा मठ तिबेटमधील ल्हासातील पोरला पॅलेसच्या धर्तीवर असून तो बारा मजली आहे. भिक्षुणींकरता येथे स्वतंत्र व्यवस्था आहे. सर्वात वरच्या मजल्यावर मैत्रेय बुद्धाची १५ मीटर उंच मूर्ती आहे. मैत्रेय बुद्ध हा मानुषी बुद्धांपैकी आठवा बुद्ध. तो बोधिसत्व असून त्याचे रूप अलंकार मंडीत आहे. गौतम बुद्धानंतर चार हजार वर्षांनी हा भूतलावर येईल अशी कथा आहे.

लेहपासून ४५ कि.मी. अंतरावर डोंगरात हेमीस गोंपा आहे. या मठात अनेक बौद्ध ग्रंथ व मूर्तींचे संग्रहालय आहे. ५०० लामा येथे राहू शकतात. लाकडी मंचावर मुख्य लामा बसतात व त्यांच्यासमोर अंथरलेल्या लांब गालिच्यांवर शिकणारे इतर स्नातक लामा समोरासमोर तोंड करून बसतात. दरवर्षी गुरू पद्मसंभवाच्या जन्मदिनानिमित्त येथे मोठा उत्सव असतो. त्यांचे मास्क डान्स पहायला परदेशी पाहुणेपण बरीच गर्दी करतात.

लेहमध्येच एअरपोर्टच्या शेजारी हॉल ऑफ फेम म्युझीयम आहे. भारतीय सैन्याला अभिमान वाटावा अशी ही जागा आहे. १९४७ पासून पुढच्या सर्व युद्धांचे फोटो, माहिती येथे पहायला मिळते. अतिशय दुर्गम वाटणारी ही अतिशीत भूमी कायम युद्धभूमी म्हणूनच धगधगत राहिली आहे. आपल्या भारतीय सैन्यानं थेट पाकिस्तानात लाहोरपर्यंत मुसंडी मारली. त्या वेळी विजयाचं प्रतीक म्हणून उचलून आणलेला (लाहोर ८ कि.मी.) दर्शवणारा मैलाचा दगड येथे ठेवलेला आहे. त्याचबरोबर युद्धात वापरलेली आयुधे व तोफा पण येथे पहायला मिळतात.

यानंतरचा प्रवास पूर्णपणे डोंगराळ भागातून होता. येथे रंगीबेरंगी डोंगरांच्या रांगा दिसतात. गुलाबी, हिरवे, निळे, जांभळे, पिवळे व काळसर रंगांचे डोंगर लक्ष वेधून घेतात. दगडांच्या मधल्या वेगवेगळ्या खनीजांमुळे हे डोंगर उघडे बोडके असूनही सुंदर दिसतात.

खारडुंग ला पास किंवा खिंड पाहिल्याशिवाय



लडाखची सहल पूर्णच होऊ शकत नाही. लेहच्या उत्तरेस ३९ कि.मी. अंतरावर १८३८० फूट इतक्या उंचीवर हे ठिकाण आहे. येथे वृक्षवल्ली खूपच विरळ, बहुतेक नसल्यामुळे प्राणवायुचा त्रास बऱ्यापैकी जाणवत होता. रस्ता पूर्ण सुरया दगडांचा आहे. लँडस्लाईड होऊन हा रस्ता कधीही बंद होऊ शकतो. हा रस्ता लेहला नुब्रा व्हॅलीशी जोडतो. जगातला सर्वात उंच मोटारने जाण्याचा हा रस्ता आहे. जागोजागी मिलीटरीचे कॅम्प्स आहेत. उंचीमुळे व वातावरणात प्राणवायुची कमी असल्याने आम्ही फक्त अर्धा तास येथे थांबू शकलो. बहुतेकजण भिमसेनी कापुराची पुरचुंडी गळ्यात बांधून फिरत होते. या कापराच्या वासाने प्राणवायुची कमतरता जाणवत नाही. एक साहस म्हणून खूप लोक येथे बाईकवरून येतात. पण रस्ता नागमोडी वळणाचा असल्याने दमछाक होत होती. थंडी व बोचरं वारंपण जाणवत होतं. खारडुगलाच्या शिखरावर लक्ष वेधून घेतात ते धार्मिक ध्वज. निळा, पांढरा, लाल, हिरवा, पिवळा या क्रमाने लावलेले हे ध्वज पंचमहाभूतांचं प्रतिक मानलं जातं. हिमालयातील निसर्ग लहरी असल्याने कदाचित, निसर्गाची व पंचमहाभूतांची विनवणी करण्यासाठी हे ध्वज लावलेले असावेत.

खारडुंगला पास उतरून, ला म्हणजेच पास, मग टुरटुक या खेड्यात गेलो. लेहपासून २०५ कि.मी. अंतरावर नुब्रा तालुक्यातील श्योक नदीच्या काठी वसलेले हे सुंदर खेडं आहे. येथून ७ कि.मी. अंतरावर पाकव्याप्त काश्मीरची हद्द आहे. १९७१ पर्यंत टुरटुक हे गाव पाकव्याप्त होतं. १९७१च्या युद्धानंतर भारताने ते काबीज केलं. गावात लोक मुस्लीम आहेत पण भारताशी एकनिष्ठ आहेत. २००९ पासून हा भाग पर्यटकांना खुला करण्यात आला आहे.

आमची व्यवस्था निसर्गरम्य अशा आलिशान तंबूमध्ये केली होती. एक वेगळाच अनुभव होता तो. गावात एक राजवाडा आहे. मशीद आहे. १९७१ नंतर भारत पाक युद्धानंतर  तुरतुक भारतात आले. पण पाकिस्तानी सैन्यानी जाता जाता राजवाड्याची मोडतोड केली. सुंदर कोरीव काम असलेले व चांदी आणि उपरत्ने जडवलेले दोन दरवाजे पळवले व एका दरवाज्यावरील रत्ने पळवली. तुरतुक भारतात आल्यावर राजवाडा राजाला परत करण्यात आला. सत्ता गेल्यानंतरसुद्धा राजवाड्यात रहाणाऱ्या राजाला भेटण्याचाही योग आम्हाला आला.

तुरतुकच्या लोकवस्तीत, काही आर्यवंशीय तर; काही तिबेटहून आलेले मंगोल चेहरेपट्टीचे लोक दिसतात. मूळचे मुसलमान असले तरी बौद्ध धर्म व बौद्ध संस्कृती त्यांनी चांगली जपली आहे. चांगपा हे भटके लोक त्यांच्या पश्मीना शेळ्यांचे कळप घेऊन लडाखच्या पूर्व पठारावर फिरताना दिसतात. लडाखमध्ये खूप स्वच्छता दिसली तरी रस्त्यात शौचालये खूपच कमी प्रमाणात दिसली.

बहुतेक घरे लाकडाची बांधतात. थंडी फार, पण पाऊस कमी. वरच्या मजल्यांसाठी उन्हात वाळवलेल्या मातीच्या वीटा वापरतात. प्रत्येक मजल्याचे छत लाकडी तुळया व आखूड वासे आणि त्यावर मातीचा थर अशा रचनेत असतात. खिडक्यांवर मात्र कोरीवकाम असतं.

तुरतुक आणि नुब्रा व्हॅलीचाच एक भाग म्हणजे हाय ॲल्टीट्यूड डेसर्ट. हिमालयामुळे रेन शॅडो तयार होतो त्यामुळे पाऊस देणाऱ्या ढगांना प्रतिबंध झाल्याने; लेहपासून १३८ किमी वर नुब्रा व्हॅलीमध्ये हे शीत वाळवंट तयार झालेलं दिसतं. येथे इतर कुठेही न दिसणारे दोन वशिंड असलेले उंट पहायला मिळतात. त्यांना बॅक्टेरीयन डबल हम्प कॅमल असं म्हटलं जातं. या कोल्ड डेसर्ट उंटावरून सफारी करणं हे खूप मोठं टूरिस्ट अ‍ॅट्रॅक्शन आहे. खरं तर मुक्या जनावरांच्या पाठीवर बसायला मन धजत नव्हतं. पण या उंट सफरीमुळे सारवानांना उत्पन्न मिळत असते अशा विचाराने थोडंसं घाबरतच या उंटावर मी बसले व २० मिनिटाची वाळवंटातच सफर केली.

या सफरीनंतर लगेचच आम्ही अंदाजे ३६०९ फूट उंचीवर असलेले शांती स्तूप पहायला गेलो. पायथ्यापर्यंत गाडी जाते; पण स्तूप पहायला ५०० पायऱ्या चढाव्या लागतात. वरून संपूर्ण लेह शहर दिसतं. हा स्तूप दोन स्तरांवर आहे. खालील चौथऱ्यावर सोन्याचा मुलामा दिलेली बोधीसत्वाची मूर्ती आहे. त्या मूर्तीसमोर सात सुबक भांड्यांमध्ये पाणी ठेवलेलं असतं. जर्दाळूच्या व बदामाच्या तेलावर किंवा याकच्या दुधापासून बनलेल्या लोण्यावर जळणारे मंद दिवे दिसतात. मधून मधून धम धम वाजणारे मोठाले नगारे पण ऐकायला मिळतात. खालच्या भागातच खूप मोठे धर्मचक्र (टर्निंग व्हिल) आहे. हा स्तूप १९८४ मध्ये बांधला

गेला. बौद्ध भिक्षू व जपानी बुद्ध लोक याची निगा राखतात. स्तूप पहाताना खूप बोचरं वारं अनुभवायला मिळालं. डोक्यावरच्या हॅट्स व ओढण्यासुद्धा उडून जात होत्या. हा स्तूप म्हणजे जपान व लडाखच्या संबंधाचं प्रतीक मानलं जातं.

लडाखमध्ये अनेक ठिकाणी हातात धरून फिरवायची प्रार्थनाचक्रे घेतलेले भाविक दिसतात. त्यावर ॐ मणि पद्मे हुं व अन्य मंत्र लिहीलेले असतात. बुद्धाला प्रसन्न करण्यासाठी ही चक्रे फिरविण्याचे कष्ट घ्यावे लागतात.

बौद्ध धर्माचे प्राबल्य असलेल्या इतर देशांप्रमाणे लडाखमध्ये अनेक स्तूप दिसतात. स्तूपाची आकृती म्हणजे जगाची प्रतिकृती असे समजतात. काही स्तूपांमध्ये बुद्धाच्या व त्यांच्या शिष्यांच्या अस्थी व काही अवशेष ठेवलेले असतात. पांढऱ्या रंगाच्या छोट्या स्तूपाला तिबेटमध्ये चोर्टेन म्हणतात. असे चोर्टेन ठिकठिकाणी पहायला मिळतात. लडाखच्या सहलीबद्दल लिहावे तेव्हढं थोडंच आहे. पण एक पाहण्यासारखी अजून एक जागा म्हणजे निमुसंगम. सिंधू नदी व झंस्कार नदीचा संगम येथे पहायला मिळतो. रिव्हर राफ्टिंगचा येथे अनुभव घेता येतो. तरुणांचा हा फेवरीट स्पॉट आहे. या संगमाच्या जागी नद्यांतील पाण्याच्या वेगवेगळ्या रंगामुळे डावीकडे वाहणारी सिंधू नदी व समोरून येणारी झंस्कार नदी ठळकपणे ओळखता येते.

संगमानंतर आम्हाला पहायला मिळाली ती मॅग्नेटिक हिल. निसर्गाचा आणिक एक चमत्कार. कारगील, लेह हायवेवर थोड्या सपाट रस्त्याजवळ ही मॅग्नेटिक हिल आहे. येथे गाडी न्यूट्रलमध्ये ठेऊनसुद्धा चुंबकीय फोर्सने, ताशी २० कि.मी.च्या वेगाने आपोआप वर जाते. हा अनुभवपण आम्ही घेतला.

आता आम्ही लडाख सहलीच्या शेवटच्या टप्प्यावर आलो होतो. तो टप्पा होता पेंगाँग त्सोचा. त्सो म्हणजे लेक किंवा सरोवर. हा निळाशार लेक 'थ्री इडीयट्स' मध्ये पाहिला होता. पण प्रत्यक्षात पहायची अतीव इच्छा होती. हा लेक समुद्र सपाटीपासून १४२७० फूटांवर आहे. क्षेत्रफळ १३४ कि.मी. आहे. त्याचा एक तृतीयांश भाग भारतात आहे तर; दोन तृतीयांश भाग चीनव्यापी तिबेटमध्ये आहे. लेहपासून हा लेक १४० कि.मी.वर आहे व येथे पोचायला पाच तास लागतात. वाटेत वळणावळणाचे सात एक डोंगर पालथे घालत जावं लागतं. अनेक स्वच्छ पाण्याचे ओहोळ रस्ता धुवत असतात. मैलोन्मैल रस्त्यात एखाददुसरी प्रवासी गाडी, आर्मीचे हिरवे ट्रक्स किंवा टेम्पो ट्रॅव्हलर भेटतात. पोचेपर्यंत प्रचंड दमछाक होत होती.

निसर्ग केव्हा बिनसेल सांगता येत नव्हतं. मनात आलं की मोठमोठाले दगड बागडत खाली घरंगळत येत असतात. जीव चिमटीत पकडून बसावं लागतं. अखेर लांबून पेंगाँग त्सोचा त्रिकोणी निळाशार तुकडा दिसला. खूप छान वाटलं. गूढ शांतता येथे पसरलेली होती. भारतीय सेनेची गस्त तर चालूच होती. लेकचं पाणी खारं होतं. जमिनीचे निमुळते रॅम्पसारखे तुकडे सरोवरात घुसलेले दिसत होते. त्यावर उभे राहून सरोवराचं विशाल रूप पहाण्याचा आनंद मिळत होता. येथे नौकाविहार मात्र मिलीटरीच्या परवानगीनेच करता येतो. तुरळक लव्हाळी दिसत होती. बाकी वनराई नाहीच. मारूमॉटससारखे प्राणी मात्र बरेच बघायला मिळाले. थकवा जाणवत होता. तंबूत रहाण्याची व्यवस्था होती पण आम्ही मात्र हॉटेलमध्ये राहिलो, तेथे ऑक्सिजन मिळण्याची सोय होती. त्याचा आम्ही फायदा घेतला.

इथली माणसं कायम हसतमुख व आदरातिथ्य करणारी. सबंध सहलीत सकस जेवण मिळत होतं. सूप, सलाड व फलाहार व मिष्टान्न तर रोजच मिळत होतं.

पेंगाँग लेक वरून सकाळी पुन्हा लेहकडे कूच केलं. लडाख सोडताना खूप वाईट वाटलं. खूप अविस्मरणीय आठवणी घेऊन आम्ही ११ व्या दिवशी लेह विमानतळाहून मुंबईकडे कूच केलं.

लडाख खूप सुंदर आहे. लडाखी बांधवांचं 'जुले' म्हणून केलेलं स्वागत खूप स्मरणात रहातं. लडाखला जरूर जा; पण शक्यतो वयाची पन्नाशी उलटायच्या आतच जा. खूप एन्जॉय करू शकाल. सर्व धर्मांच्या व वंशांच्या सामंजस्यातून त्यांच्या निरनिराळ्या सांस्कृतिक व व्यावसाईक कौशल्यातून उदयाला आलेली लडाखची संस्कृती, निसर्गाशी सतत जमवून घेऊन व निसर्गावर मात करून हसतमुखाने रहायला कशी शिकवते; हे बघायला तरी नक्कीच जा.

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Bhutan: A Journey In The Happy Land

**✶ Ketaki Rajan Jayakar ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀



Summer Holidays have always excited me even at the age of sixty plus.

I decided on Bhutan as my destination and alongwith six other like minded couples we booked our tickets with Veena World. We were received at the airport by their Manager with a lovely hamper of dry snacks consisting of banana wafers, chakli, chivda and a whole lot of goodies. According to me that itself was a wonderful beginning. Travelling means eating from the word go!

Bombay to Delhi, then to Bagdogra the flight was very pleasant. (Folks remember when you are flying into the Himalayas the weather is extremely unpredicatable, so chose the early part of May). At Bagdogra we were received by the Tour Manager Kunal Shinde, a very young and bright lad, extremely patient and helpful. We had Innova Cars, one for six of us. The journey from Bagdogra to Phuntsholing was very beautiful. The roads were smooth and were flanked on one side by a continuous canal and on the side with swaying fields of rice and other tall trees. We reached the first city in Bhutan i.e. Phuntsholing by about 6p.m. Hot cup of tea awaited us and we were allotted our rooms and our bags were sent to our respective rooms. The hotel was first class, with a huge swimming pool and large compound surrounded by tall trees.

Next morning we had to obtain our visitor's permit so we all went to the Tourist Office to obtain the permit. Thanks to Veena World that was taken care of within an hour and then we were on our journey into the Happy Land of Bhutan. The journey from Phuntsholling to Thimphu is indeed very long and goes up the winding roads, higher and higher, but if one has to reach some heights we have to undertake tortuous journeys patiently. The scenery was changing constantly with the height. It was indeed cold. The whole day we were travelling in the bus. Luckily all our fourteen members were in one bus so the journey was all the more enjoyable. For Rajan it was one of a school picnic since all his school friends from 5B of Wilson School were in the bus. Late in the evening we reached Thimphu which is now the Capital of Bhutan. The Hotel Pine Resort ,





Wangchu was picture perfect. It had wooden panelling, a lovely little balcony outside the room from where one could see the pine tree with bunches of cones hanging. It was like any European scene with wooden challets and the coniferous trees dotting the hillside. That evening before dinner the whole group was invited to introduce themselves to the other members.

Next morning we left for sight seeing. Thimphu city is a very beautifully laid city with uniformly constructed buildings with mustard coloured walls with red windows. It is in the valley with mountains surrounding it. The first place was King's Memorial Chorten. In Bhutan the King is highly revered and we began with this Stupa built to honour the 3rd King of Bhutan.It is a Tibetan style Stupa which represents the mind of the Buddha. There is a large open space around the Stupa for people to perform the Parikrama and for the first time I saw that there were wooden planks for the people to prostrate upon. There were huge prayer wheels in the compound where the devotees were turning them. There were butter lamps to be offered for the departed ancestors. Needless to say that the place was spick and span inspite of the thousands of visitors. The Happy Land indeed has very good vibrations. We had a lovely Bhutanese Guide Kinley who thankfully spoke good English and was very knowledgeable. It is very important to have a good guide on your journey whether it may be the journey of life or in your travels.

From the King's Stupa our travel party climbed a hill to see the tallest Buddha in the world. It is about 169 feet high and is made of bronze and guilded with gold. The mere size is magnificent, although the precincts are yet to be completed. It is to be seen to be believed. The passion with which the workers were working on it shows the people's great reverence for Buddhism. The golden Yakshinis at the foot of the tall statue add to the beauty and grace of the site. It surely can become one of the wonders of the world. The tall Buddha showers his blessings on the City of Thimphu from whichever angle you see. We then proceeded to the Zoo to the national animal Takin which has the head of a goat and the body of a cow. Can you believe the national bird is the Raven! Black is beautiful. In marathi we call it Dom Kawla, but in Bhutan it is revered. Beauty indeed lies in the eyes of the Beholder! We saw the clock tower in the market place.

Then finally at the end of the day at 5p.m. we went to the Thimphu Dzong. The visitors are allowed in the Dzong only after working hours. The king lives in a small bungalow near the Dzong (his office) and goes home on a cycle. At times he meets the public and talks to them and accepts their petitions. The Dzong is a Defence Fortress which has the Government offices as well as the religious headquarters. In ancient






times they were used as defence fortress to house the soldiers. The Dzongs are huge white buildings with beautifully painted red/maroon windows with designs. They have a Tibetan look. The Thimphu Dzong is the longest Dzong in Bhutan. (Please wear full sleaved shirts/ blouses and do not cover your hair.) There is a central courtyard flanked by the two halves housing the monks and the administrative Departments. There is a big ceremonial hall where there is a huge statue of Sakyamuni Buddha flanked by Guru Padmasambhav and Shabdung the Tibetan king who came to Bhutan and unfied it . The decoration of artificial flowers, the butter oil lamps, the coloured cloth hangings add to the grandeur and sanctity of the place . You have to be physically fit to undertake this journey, because you have to walk and walk and walk. The steps are steep and tall. The terrain is hilly and you have to climb up and down even from your hotel room to the reception.

From Thimphu we went to Punakha via the Dochula Pass. !0,000 feet high above the sea level, it was indeed very cold and then it started drizzling which made it chilly. Punakha is the most scenic of them all. Its Dzong is the most beautiful of all the Dzongs. It is built on the confluence of the Poshu Moshu Rivers and there is a lovely bridge to cross over and reach the place. A whole row of purple Jacaranda trees in full bloom welcomed us. The white red and gold Dzong was breathtaking! There are gold guilted staircases to climb up to the Dzong. The staircases are like the ones in a ship ---steep and touching the wall. Inside the Dzong is the relic of a Tibetan lama and is preserved for many many years. All the Dzongs have the same design. Unfortunately all the dzongs got burnt down and have been rebuilt from time to time. The wooden flooring, the cloth hangings and the butter oil lamps seem to have caused the fire. We also visited the Baby Temple where people come with their small babies to thank the deity for their babies. It is quite a walk up there, but all of us went there to thank for our little bundles of joy.

From Punakha we went to Paro. The oldest Dzong was there, the Bhutanese Museum and of course the Tiger Nest Monastery which none of us were capable of climbing. We went up to the base camp and could barely see the monastery hidden amongst the trees about 7,000/8000 feet high above us. We saw travelers returning from their trek having taken about six/seven hours to climb up and then come down. The market down below had very lovely local things like wind chimes, trinkets, statuettes etc. The whole atmosphere was so clean, fresh and energised. We returned to our hotel to a beautiful Bhutanese cultural programme. A small group of a husband and wife with their three year old son and a few young girls and boys presented their Dances including the Mask Dance. Their singing is amazing coupled with the dance mudras. Their synchronised singing was like the playing of the Shehnai, so high and sweet. The little boy too sang with gusto. Finally all of us ended joining in the group dance.

Well, all good things had to come to an





end. We again left for Phuntsholling, stayed at the Tashi Namgyal Grand hotel, left for Bagdogra, flew to Delhi, and finally to Bombay.

Friends, can you believe it that on the first day of my trip, outside the hotel at Phuntsholling I fell flat on my face and hurt myself very badly, however with a few enzoflams I was able to undertake the whole journey comfortably. After returning to Bombay I found out that I had a hairline fracture of my hip bone and my leg was paining!. I think it is only the blessings of my Masters that saw me through this journey comfortably.

*

---

# बालशिल्पे



**अनिष नील कीर्तिकर**

(इयत्ता ७ वी)

(बागेश्री परीख यांच्या कार्यशाळेतून प्रशिक्षण घेऊन केलेले शिल्प)



**विवान श्रीपाद आगासकर**

(सिनीयर के.जी.)

(घराजवळील कार्यशाळेतून प्रशिक्षण घेऊन केलेले शिल्प)

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Nam – myoho – renge – kyo

**✶ Anuradha Simit Desai ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Our travels took us to Sikkim this year, in early September, and we fell so in love with the land and its people. Here I attempt to share with you a few snippets from our journey, an experience really, through some random clicks. Works of art they surely are not and do no justice to the actual landscapes! Please do bear in mind that I am not skilled at photography, and am really a reluctant photographer. It was just the unending natural beauty of the place that inspired me to take so many pics, most of which are taken from a moving car. Am sure the magnificence of the place will make up for the poor pics! And no filters too!

We started our road journey from Bagdogra and were instantly greeted with a magical land covered in mist and greens so resplendent, dense foliage in all shades of green, and forest covered mountains dark and wet. I just soaked it all in, through my eyes and ears and skin and mind and soul…. If you have seen BFG, it was like the land BFG lived in.

Our climb up to Gangtok from Siliguri was for a large part alongside the Teesta and we were treated to glorious views with every turn of the road. A host of monkeys seemed to be enjoying the view too! The snow fed rivers Teesta and its tributary Rangeet kept us company through our week long journey.



The Teesta flowing fast and furious, winding through the mountains.

Weary after bumping along roads that were non – existent, across several landslides, and climbing steeply, Gangtok was a sight for sore eyes. Its



Beautiful Gangtok

colorful houses and winding roads were surely unique, but oh the cleanliness and traffic discipline! It is apparently the cleanest city in India, no spitting or urinating in public places, no litter. No honking, jumping lanes or signals, no parking mindlessly! Was I still in India? The people added to the charm with their polite and ever helpful nature. The crime rates are very low too and we were able to explore this city on foot too, by ourselves, feeling completely safe even after dark.

The army was omnipresent and more so as we approached the Nathu La pass. They not only look after the security of the nation, but also the maintenance of roads through Border Roads



Bridge built across chasm created by a massive landslide.

Organization in these geographically challenging terrains to ensure smooth passage of civilians. While several roads were blocked due to landslides and the army was helping in clearing these, here is a bridge the army built where a section of the road was wiped away. To cross that wooden bridge was an adventure in itself, I can still hear the rumble of the wooden blocks as the car passed over them.

One of the three mountain lakes in Sikkim, Tsongmo lake or Changu lake as the Bengalis call it, is situated at an altitude of some 12000 feet. Where did the water end and clouds begin? We saw real life yaks for the first time here. These are massive



Tsongmo Lake / Changu Lake

animals obviously built for the terrain. Yak milk, cheese and meat are pretty popular. The other mountain lake we visited was Khecheopalri which is a lake so sacred and serene, that apparently even a leaf that falls into the water is immediately picked up by birds.

This temple located at some 14000 feet in the middle of the mountain with a waterfall roaring by its side was very inviting. Since the climb seemed modest, we could not resist. Soon the high altitude had us huffing and puffing but the views along the way were rewarding. Surrounded by the majestic Himalayan range, it was an ideal setting for the temple.



Shiv Mandir near Baba Temple

The chilly weather cried out for cups of hot chocolate had at leisure during late afternoons, looking over valleys filled with clouds. What better way to contemplate life! Tea was a major highlight of evenings spent playing board games and cards along with hot pakodas. We actually used a tea cozy for the first time along with the fancy tea strainer. Momos, Maggi, chowmein and the local preparation Thukpa were part of the staple diet through our visit. I have always liked momos, now I have had an



Tea service

overdose!

The rainbow was formed by the spray of water caught in sunlight. Myriad hues of the ever changing sky, the green quilt covered mountains, the play of light and shadow, the water…oh how could I ever capture all this beauty!! I could only save it in my mind's eye.

Since the weather was cloudy and misty, whether we would actually be able to see these



Numerous waterfalls crashing down from lush green mountains, drenching and refreshing us body and soul.

peaks in Pelling was a great suspense. And in keeping with a good suspense drama, there were several false starts. Oh, is that a snow covered peak? No, it's a cloud! Look, the clouds are lifting….will we see the peaks now? No, the clouds are getting denser. It's started raining! It's getting dark. Until one early morning as the darkness was slowly fading, there outside our hotel window we saw the faint outlines of these majestic peaks emerging. The clouds gradually parted for the grand finale and these giants showed themselves. I cannot describe the exhilaration we felt. Kanchenjunga, the third



Snow covered peaks

highest peak in the world, is on the right, it's actually the smaller one as it is at a distance.

Ancient monasteries nestling in the sides of huge mountains and prayer flags fluttering against the sky were routine sights. Buddhism is the most prominent religion in Sikkim and plays a significant role in public life. The essence of Buddhism is the conviction that we have within us at each moment the ability to overcome any problem or difficulty that we may encounter in life; a capacity to transform any



suffering. Our lives possess this power because they are inseparable from the fundamental law that underlies the workings of all life and the universe. In Sikkim, all life and the universe does become one.

To chant Nam-myoho-renge-kyo is an act of faith in the magnitude of life's inherent possibilities. It is the principle that those who live normal lives and make consistent efforts will duly triumph. **Nam – myoho – renge – kyo.**

✳

# छायांची छाया



**स्मिता अरविंद राव**




**जान्हवी नील कीर्तिकर**



**अदिती अनिकेत तळपदे**



श्वेता शिरीष कोठारे



शौनक कौशिक जयकर



अनिष्का अनिकेत तळपदे

(इयत्ता ७ वी)



**अदिती सीमित देसाई**

(इयत्ता ६ वी)



**मिथील वेलकर**



**विवान श्रीपाद आगासकर**

(के. जी)




**श्रिया कौशिक जयकर**

(इयत्ता ८वी)

# रांगोळी चित्रे




मिनाक्षी कौशिक जयकर



सुगंधा शिरीष कोठारे

रां
गो
ळी
चि
त्र



बागेश्री योगेन धुरंधर परीख

तै
ल
चि
त्र



स्मिता अरविंद राव



**श्वेता शिरीष कोठारे**